[इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठीमध्ये अनुवाद]

[१९९६] २ एस.सी.आर. ४०९

भारत संघराज्य

विरुद्ध

मे. अॅग्रो इंजिनीअरिंग (एमपी) . प्रा. लि. आणि इतर

फेब्रुवारी ९, १९९६

[न्या. के. रामास्वामी आणि न्या. जी. बी. पटनाईक]

अनुदान – ची मंजूरी – योजनेअंतर्गत - ३० सप्टेंबर १९८८ रोजी किंवा त्यापूर्वी केलेले अर्ज-भारत सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या अटींचे पुरेसे पालन करणारे अर्ज- योजनेनुसार अनुदान देण्याबाबत विचार करून त्यांचा निपटारा करणे - शासनाकडे परत पाठविलेले प्रकरण – सर्वोच्च न्यायालयाने खलील प्रकर्णनात नमूद केलेल्या कायदयाच्या आधारवार त्याची तपासणी व विल्हेवाट लावण्यासाठी त्या दृष्टीने स्थापन केलेली समिती :

भारत सरकार वि. आरबी पाईप अँड प्रोफाईल्स अँड इतर, दिनांक १ फेब्रुवारी १९९६; उमेश टेक्सटाईल अँड इतर आणि भारत संघराज्य आणि इतर, दिनांक ५ डिसेंबर १९९५ रोजी आणि एमपी राज्य वि. अॅग्रो इंजिनीअरिंग (एमपी) प्रायव्हेट लिमिटेड अँड इतर, दिनांक १ नोव्हेंबर, १९९५.

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्रमांक ३६२५/१९९६.

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने दिनांक 25.7.94 रोजी एम.पी. क्र. 1435/1990 मध्ये पारित केलेल्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी - के.टी.एस. तुलसी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल, ए.एस.रावत आणि डी.एस.मेहरा.

उत्तरवादीसाठी - ए. के. सांघी, एन. के. डाबे आणि दिवाकर चतुर्वेदी.

न्यायालयाचा आदेश खालीलप्रमाणे पारित करण्यात आला :

विलंब माफी मंजूर.

अनुमती दिली.

या न्यायालयाने पुढील प्रकरणांमध्ये तीन आदेश पारित केले आहेत – तीन न्यायाधिशांच्या खंडपीठाने, दिनांक १ फेब्रुवारी १९९६ रोजी भारत संघराज्य वि. आरबी पाईप अँड प्रोफाईल्स

आणि इतर मध्ये; दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिनांक ५ डिसेंबर, १९९५ रोजी उमेश टेक्सटाईल आणि इतर वि. भारत संघराज्य आणि इतर मध्ये आणि दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिनांक १ नोव्हेंबर, १९९५ रोजी एमपी वि. अॅग्रो इंजिनीअरिंग (एमपी) प्रा. लि. आणि इतर मध्ये, आदेश पारित केले. त्या सर्व प्रकरणांतील निर्देशांचा आशय असा आहे की, दिनांक ३० सप्टेंबर १९८८ रोजी किंवा त्यापूर्वी भारत सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद केलेल्या अटींचे पुरेसे पालन करून अर्ज केल्यास योजनेनुसार अनुदान देण्यासाठी त्यांचा विचार करून त्यांची विल्हेवाट लावली जाईल. तसाच आदेश या बाबतीतही असावा. त्यानुसार अपील निकाली काढले जाते. हे प्रकरण सरकारकडे पाठवले जाते आणि त्या दृष्टीने स्थापन केलेली समिती या प्रकरणाची तपासणी करेल आणि या न्यायालयाने घालून दिलेल्या कायद्याच्या आधारे त्याचा निपटारा करेल. खर्चाबाबत आदेश नाहीत.

अपील निकाली काढण्यात आले.

**x-x-x-x-x-x-x**

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक

आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x-x-x-x**